# प्रकरण पाचवे

# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती कोल्हापूर :
# मुल्यमापन व निष्कर्ष

१) प्रास्ताविक

२) बाजार समितीच्या कार्याचे मुल्यमापन, निष्कर्ष व उपाययोजना.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## प्रास्ताविक :

महाराष्ट्राच्या आर्थिक व राजकीय जीवनामध्ये व इतर सर्वच क्षेत्रात सहकारी चळवळीने व शेतीमाल बाजारपेठांनी मोलाची कामगीरी बजावलेली आहे. सहकारी चळवळीच्या उज्वल यशाबाबत कोल्हापूर जिल्ह्याची ख्याती सर्वत्र पसरलेली आहे. संपूर्ण देशामध्ये कोल्हापूरची गूळ बाजारपेठ प्रसिध्द झाली आहे. बाजारसमितीने आजपर्यंतची आपली वाटचाल राजर्षि शाहू महाराजांच्या विचाराने चालू ठेवलेली आहे. राजर्षि शाहू महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने स्थापन केलेली बाजारपेठ आजही येथील शेतकरी व इतर सर्व संबंधीत घटकांचे हित जपण्यासाठी प्रामाणिकपणे कार्यरत आहे. आजही बाजारपेठ श्री शाहू मार्केट यार्ड म्हणून सर्वदूर परिचित आहे.

बाजारसमितीस महाराष्ट्र शासनाने लागू केलेला १९६३ चा कायदा, समितीच्या संचालक मंडळाचे संघटन त्याचप्रमाणे बाजार समितीचे कार्यक्षम प्रशासन याचा बाजार समितीच्या विकासातील सहभाग व बाजारपेठेचे कामकाज चालविण्यातील प्रामाणिक प्रयत्न मोलाचे आहेत. बाजार समितीच्या आजपर्यंतच्य विकासात शेतकरी, व्यापारी व कामगार यांचे श्रम व प्रामाणिक कार्य यांचा मोठा वाटा आहे. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने कोल्हापूरच्या कृषि औद्यागिक विकासात व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीत मोलाची भर घातली आहे. बाजारसमितीच्या राजकीय जीवनात व निवडणूकांमध्ये अनेक राजकीय कार्यकर्त्यांना समितीने येथील राजकीय क्षेत्रात पुढे आणले आहे. विकासाच्या राजकारणात येथील राजकीय नेतृत्वाने बाजारपेठेला नवी गती नवी दिशा देण्यांचे काम केले आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील बहुतेक सर्व राजकीय नेतेमंडळींचा बाजार समितीशी कोणत्या ना कोणत्या अर्थाने संबंध आलेला दिसून येतो.

''कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर : एक राजकीय व प्रशासकीय अभ्यास'' हा शोधप्रबंध लिहीत असताना बाजार समितीची ऐतिहासीक पार्श्वभूमी व परिचय, बाजारसमितीचे प्रशासकीय कामकाज, सर्व संबंधीत घटकांचे विकासात्मक कार्य व राजकारण आणि राजकीय नेतृत्वाचे योगदान याचा विचार करण्यात आला आहे.

## बाजार समितीच्या कार्याचे मुल्यमापन, निष्कर्ष व उपाययोजना :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने जी विकासात्मक वाटचाल केली आहे ती उल्लेखनीय आहे. कोल्हापूर शहरामध्ये पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गाशेजारी बाजार समितीची, एका विस्तीर्ण जागेवर जी प्रगतीची वाटचाल सुरू आहे, त्या ठिकाणी जी शेतीमालाची उलाढाल होत आहे ती कोल्हापूरच्या आर्थिक विकासाची नाडी आहे. राजर्षि शाहूंसारख्या द्रष्ट्या नृपतीकडे या संस्थेचे जनकत्व जाते यातच आजच्या यशस्वीतेचे गमक आहे. बाजार समितीने गेल्या अनेक वर्षात जे प्रगतीचे टप्पे गाठले आहेत ते पहात असताना भविष्यकाळात जागतिकीकरण व बाजार पेठेतील संबंधीत घटकांना जाणवणाऱ्या उणिवांची दखल बाजार समितीला यशस्वी वाटचालीसाठी घ्यावी लागेल. याच दृष्टीने बाजार समितीच्या आजपर्यंतच्या कार्याचे मूल्यमापन करणे व भविष्यात बाजार पेठेच्या सक्षमतेसाठी संबंधीत घटकांनी सुचविलेल्या उपाययोजनांचा विचार करणे महत्वाचे वाटते.

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये भारतातील शेतीव्यवसाय, बाजारनियंत्रणाचा आढावा, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील बाजारनियंत्रणाची वाटचाल, यांचा अभ्यास केला आहे. कोल्हापूर बाजारपेठेची ऐतिहासीक पार्श्वभूमी सविस्तरपणे मांडली आहे. तसेच कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीचा परिचय या प्रकरणामध्ये मांडला आहे. राजर्षि छत्रपति शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शेती उत्पादीत मालाला बाजारपेठ मिळावी व शेतीव्यवसायाला स्थैर्य प्राप्त होवून त्याचा विकास व्हावा या दूरदृष्टीने १८९५ साली बाजारपेठेची स्थापना केली होती. बाजारपेठेचा विकास व्हावा म्हणून त्यांनी आवश्यक त्या सवलती दिल्या होत्या. त्यांच्या उदार आश्रयाने पेठेचा विकास होत राहीला. राजर्षि शाहू महाराजांच्यानंतर छत्रपति राजाराम महाराज, नाम. भास्करराव जाधव, श्री. जे.पी, नाईक, श्री. नारायणराव देसाई यांच्या सारख्या ज्ञानी व्यक्तींनी मार्केट कमिटीची रचना केलेली आढळते.

कोल्हापूर बाजार समितीला ऐतिहासीक पार्श्वभूमी आहे. आजही बाजार समितीच्या कामकाजात व बाजारपेठेच्या वाटचालीत छत्रपति राजर्षि शाहू महराजांच्या आदर्शांचा, शिकवणूकीचा व कार्याचा प्रभाव जाणवतो. राजर्षि शाहू महाराजांनी जी दूरदृष्टी ठेवून या बाजारपेठेची

स्थापना केली होती त्याचा विचार करता बाजारपेठेची आजची वाटचाल व प्रगती त्यांच्या स्वप्नास आकार देणारी वाटते.

कोल्हापूर बाजार समितीचा परिचय पहात असताना बाजार समितीचा जिल्ह्याच्या शेतकऱ्यांच्या विकासातील वाटा महत्वाचा आहे. बाजार समितीने पेठेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीत अनेक चांगल्या कामकाज पध्दतींचा प्रभावीपणे अंमल केला आहे. कामकाजात सर्वसंबंधीत घटकांच्या हितास योग्य प्राधान्य देत असाताना कायद्यानुसार बाजारपेठेचे नियमन केलेले आहे. बाजार समितीने शेतकऱ्यांचे शेतीमाल खरेदी विक्री व्यवहारातील शोषण थांबवून त्यांना चांगला भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर बाजारपेठेवर आवश्यक सेवा सुविधांचा पुरवठा करुन संबंधीत घटकामध्ये समन्वय व विश्वास निर्माण करण्यासाठी योग्य प्रयत्न केले आहेत.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये बाजार समितीस लागू असलेला कायदा, बाजार समितीचे संघटन व प्रशासन या गोष्टींचा अभ्यास केला आहे. कोल्हापूर संस्थानाने मार्केट कायदा १५ ऑक्टोबर १९४५ साली या बाजारपेठेस लागू केला. पूर्वीच्या काळी सन १९३९ चा कायदा लागू होता. सध्या कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती ही संस्था ''महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३''हा कायदा आणि त्याखालील नियम, १९६७ नुसार कामकाज करत आहे. वरील कायद्यामुळे बाजार नियंत्रणाच्या कामामध्ये एकजीनसीपणा आलेला आहे. कायद्याच्या मूळ उद्देशामुळे बाजार समितीचा योग्य विकास झाला आहे व बाजारपेठांची निकोप वाढ झाली आहे. शेतकऱ्याच्या मालास योग्य भाव मिळावा त्याचप्रमाणे खरेदीदाराला एकत्रित माल मिळून प्रतवारी करणे सोयीचे व्हावे व चांगल्या दर्जाचे शेतीमालाचे उत्पादन होण्यास उत्तेजन मिळावे या हेतूने बाजार नियमनासाठी या कायद्याने नियंत्रीत बाजार क्षेत्र स्थापन करण्यात आली आहेत. सध्या बाजारसमितीमध्ये कायद्याचा उद्देश साध्य होताना दिस्तो आहे. कायद्यामध्ये बाजारसमितीच्या एकंदरीत कामकाजपध्दतीसाठी योग्य मार्गदर्शन केले आहे. या कायद्याने बाजार समितीस कृषि उत्पन्न

खरेदी विक्री नियमनाच्या क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, म्हणजे निमशासकीय संस्था असे स्वरूप दिले आहे.

**सध्याच्या कायद्यामध्ये काही प्रमाणात उणिवा जाणवतात त्याचप्रमाणे बदलत्या परिस्थतीनुसार काही सुधारणांची आवश्यकता वाटते**

१) कृषि क्षेत्राच्या विकासासाठी सक्षम बाजार व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यातील कृषि पणन व्यवस्थेचा विचार करता कायद्याने बाजारव्यवस्थेच्या नियमनाबरोबरच बाजारव्यवस्थेचा विकास करणेसाठी कायद्यात तरतूद करणे आवश्यक वाटते.

२) बाजार आवरात शेती माल आल्यानंतर काही अनाकलनीय परिस्थिती निर्माण झाल्यास (उदा. संप, बंद, बाजारभावात लक्षणीय घट, इत्यादी) बाजारसमितीने तो माल स्विकारणे अथवा त्याची साठवणूक व्यवस्था करण्यासाठी कायद्यामध्ये तरतूद नाही. शासनाने या बाबत कायद्यात तरतूद करावी जेणेकरून शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. यासाठी शासनाने बाजारसमित्यांना आर्थिक सहाय्य देण्याची व्यवस्था कायद्यानुसार असावी.

३) बाजार समितीला शासनाच्या जमिनी बाजारपेठेच्या विकासासाठी अग्रक्रमाने मिळण्याची तरतूद असावी. त्याचप्रमाणे बाजारसमितींना जमिन संपादनासाठी शासनाकडून त्वरीत कार्यवाही होण्याची तरतूद कायद्यामध्ये समाविष्ट असावी.

४) कायद्यामध्ये शेतकऱ्याने आपला जास्तीत जास्त शेतीमाल बाजार आवारात आणला पाहिजे अशी तरतूद नाही. बाजारसमितीच्या विकासासाठी व शेतकऱ्यांच्या हितसंवर्धनासाठी अशी तरतूद करणे आवश्यक वाटते.

५) बाजार आवारामध्ये जास्तीत जास्त सुविधा व विकासकामे करण्यासाठी केंद्रसरकार व राज्यसरकार यांनी अनुदान द्यावे. यासाठी कायदेशीर तरतूद करणेत यावी.

६) बाजार समिती ही "व्यापारी संस्था" या संज्ञेत नसावी. व्यापारी संस्था म्हणून समितीचे वर्गीकरण केल्यामुळे इतर सवलतीसाठी जास्त किंमत द्यावी लागते. उदा. वीज,

म्युनिसिपलकर-आकार व इतर शासकीय कर इत्यादी, म्हणून कायद्याने बाजार समिती ही ''कृषी संस्था'' या संज्ञेत असावी.

बाजार समिती ही सामुदायिक (Corporate) स्वरूपाची संस्था आहे. समितीमध्ये कामकाज चालविणेसाठी संचालक मंडळाचे संघटन केले आहे. बाजारात ज्यांचे ज्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात अशा सर्व घटकांना प्रतिनिधीत्व दिलेले आहे. बाजारसमितीत शेतकरी हितासाठी शेतकरी प्रतिनिधींचे मताधिक्य असते. त्याचप्रमाणे इतर संबंधीत घटकांनाही योग्य ते प्रतिनिधीत्व देऊन सर्व समावेशकता व समतोलपणा आणलेला आहे. समितीमध्ये पदाधिकारी म्हणून सभापती व उपसभापती यांची निवड केली जाते ते शेतकरी प्रतिनिधीच असतात. संचालक मंडळाचा कालावधी पाच वर्षांचा असून समितीची निवडणूक जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत घेतली जाते.

**बाजारसमितीचे संघटनात्मक कामकाज प्रभावित होण्यासाठी खालील उपाययोजनांची आवश्यकता आहे -**

१) बाजार समितीवर शेतकरी प्रतिनिधी म्हणून निवडल्या जाणाऱ्या उमेदवारासाठी, तलाठी/सरपंच यांचा ती व्यक्ती शेतकरी आहे असा दाखला शेतकरी प्रतिनिधी गटातून उभा रहाणेसाठी पात्र ठरविणेत आला आहे. ही तरतूद मोघम स्वरूपाची असून जे शेतकरी बाजार समितीमार्फत मालाची विक्री करतील त्यांना शेतकरी प्रतिनिधी गटातून उभा रहाणेस पात्र ठरविणेत यावे.

२) बाजार समितीवर स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महानगरपालीकेचा एक प्रतिनिधी पाठविला जातो. महानगरपालीका शेतीमालावर जकात आकारते. परंतू बाजार आवारामध्ये रस्ते, विद्युत व्यवस्था, स्वच्छता, इ. सुविधा महानगरपालीका करत नाही. जकातीच्या उत्पन्नातून बाजार आवारातील विकासासाठी खर्च करण्याची तरतूद झाली पाहिजे.

३) बाजार समितीच्या संचालक मंडळात अनुभवी व तज्ज्ञ व्यक्तींच्या ज्ञानाचा उपयोग होण्यासाठी तज्ज्ञ संचालकांची निवड केली पाहिजे. तज्ज्ञ संचालक निवडताना कार्यकर्त्यांची राजकीय सोय

पाहण्यापेक्षा विकासाचा दृष्टीकोन असणारी माणसे निवडली जावीत, यासाठी तरतूद होणे आवश्यक आहे.

बाजारसमितीच्या कामकाजात संचालक मंडळ निर्णय घेण्याचे काम करते. सभापती व उपसभापती या पदाधिकाऱ्यांच्या मार्फत दैनंदीन कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवली जाते. दैनंदीन प्रशासकीय कामकाज कर्मचारीवर्गाला करावे लागते. प्रशासन यंत्रणेतील महत्वाचे घटक म्हणजे सभापती व सचिव हे आहेत. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय कामकाज सचिवांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारीवर्ग प्रामाणिकपणे करत आहे. कायदा व व्यवहार यांची सांगड घालून प्रशासकीय कामकाज केले जात आहे. समिती सेवेतून निवृत्त झालेल्या सचिव व इतर कर्मचाऱ्यांनी आपल्या कामकाजाचा ठसा उमटविला आहे. बाजारपेठेच्या हितासाठी व समितीच्या योग्य कामकाजासाठी प्रशासनाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागते.

**बाजार समितीचे दैनंदीन कामकाज प्रभावी होणेसाठी समितीमध्ये प्रशासकीय सुधारणांना अधिक वाव देणे आवश्यक आहे -**

१) बाजार समितीच्या सचिव पदावर योग्य शिक्षित, प्रशासनातील कार्यक्षम व्यक्तिची नियुक्ती करावी.

२) जागतिक व्यापार करार आणि खुल्या अर्थव्यवस्थेमुळे बाजार समितीच्या कामकाजात व जबाबदारीत बदल होणे अपेक्षीत असून या बदलांना समोरे जाणेसाठी बाजार समित्यांचे अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

३) बाजार समितीच्या उत्पन्नातील योग्य तो खर्च प्रशासनावर केला जावा की ज्यामुळे बाजारपेठेच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करता येईल.

४) जिल्हा परिषद, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असलेल्या अधिकाराप्रमाणे बाजार समितीच्या सचिवांना प्रशासकीय अधिकार असावेत.

५) बाजार समितीची प्रशासकीय जबाबदारी कर्मचारी वर्गावर आहे. कामकाज करत असताना कर्मचारी वर्गावर एखाद्यावेळेस अन्याय झाला अथवा संकटकालीन परिस्थिती निर्माण झाली तर आपली योग्य बाजू मांडता यावी यासाठी संचालक मंडळामध्ये कर्मचारी प्रतिनिधी कर्मचारी वर्गातून निवडून देण्याची व्यवस्था असावी. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे हक्क अबाधित राहतील व ते समितीस अधिक चांगली सेवा पुरवितील.

६) संचालक मंडळाकडून कर्मचारी वर्गाची नियुक्ती केली जाते. त्यामध्ये योग्य पात्रता असणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवड होण्याच्या दृष्टीने कायदेशीर तरतूद होणे गरजेचे आहे.

प्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये "शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या हितसंवर्धनासाठी शेती उत्पन्न बाजार समितीचे कार्य" यासंबंधी, गूळ विभाग, कांदा बटाटा विभाग, भाजीपाला विभाग, धान्य विभाग, जनावरे बाजार विभाग तसेच उपबाजार व इतर विभाग असा विभागवार कामकाजाचा आढावा घेणेत आला आहे.

शेतकरी हा बाजार समितीच्या कार्यातील पायभूत घटक आहे. बाजारपेठेची उलाढाल ही शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या शेतीमालाच्या खरेदी विक्रीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या श्रमाला म्हणजेच त्याने उत्पादीत केलेल्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा या हेतूने बाजारसमितीचे कार्य चाललेले आहे. शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन व सोयीसुविधा देण्याचे काम बाजारसमिती प्रमाणिकपणे करत आहे. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीत मोलाची भर घातली आहे. तरीसुद्धा शेतकरी आपला सर्व उत्पादीत माल बाजारपेठेवर विक्रीस आणत नाही. याचाच अर्थ बाजार समितीने आपली विश्वासार्हता वाढवून सर्व शेतीमाल बाजारपेठेत विक्रीस येणेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी समितीच्या विकासाचा दृष्टीकोन ठेवून बाजार समितीने कार्य करणे आवश्यक आहे.

**म्हणून बाजारसमितीने शेतकरी हितासाठी कार्य केले असले तरीही शेतकऱ्यांना येणाऱ्या अडीअडीचणींची पूर्णपणे सोडवणूक करणे महत्वाचे आहे-**

१) बाजार पेठेतील व्यापारी, कामगार आपल्या हिताच्या मागण्यांसाठी शेतीमालाची खरेदी-विक्री बंद करतात, पर्यायाने शेतकऱ्याने उत्पादीत केलेल्या शेतीमालाचे नुकसान होते. त्यामुळे बाजार समिती, शासन व संबंधीत घटकांनी अशावेळी खरेदी विक्री बंद न करता चर्चेद्वारे मार्ग काढावा.

२) आपतकालीन परिस्थितीत बाजार समितीने शेतकऱ्याच्या उत्पादीत मालाची साठवणूक व्यवस्था केली पाहिजे.

३) शेतीमाल विशेषत: गूळ, कांदा बटाटा, भाजीपाला व फळे हा नाशवंत असलेने त्यांची योग्य साठवणूक व्यवस्था, शितगृह उभारणी तसेच भाजीपाला व फळे यासाठी लहान प्रक्रिया प्रकल्प उभारणे आवश्यक आहे.

४) गूळ, कांदा बटाटा व आंबा या शेतीमालाच्या निर्यातीसाठी निर्यातक्षेत्र होणे आवश्यक आहे.

बाजार समितीमध्ये व्यापारी हा घटक बाजारपेठेच्या कामकाजातील दुसरा महत्वाचा घटक आहे. व्यापाऱ्यांच्या सहभागामुळे, कौशल्यामुळे व कष्टामुळे शेतकऱ्याच्या शेतीमालाचा योग्य खरेदी विक्री व्यवहार होतो. व्यापाऱ्यांच्या योग्य नियोजनामुळे शेतीमालाचा उठाव होतो. त्याचप्रमाणे योग्य भाव मिळणेस मदत होते. व्यापारी शेतीमालाची प्रतवारीनुसार विक्री करतात. त्यामुळे चांगल्या उत्पादनास चांगला भाव मिळतो व शेतीउत्पादनास चालना मिळते.

बाजारसमितीने व्यापाऱ्यांना परवाने, व्यापारासाठी योग्य जागा, गाळे, गुदामे, व इतर सुविधा दिल्या आहेत. व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी बाजार समिती व व्यापाऱ्यांच्या संघटना सामुदायीकपणे प्रयत्न करतात. त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांनी आपल्या हिताबरोबरच शेतकरी हितासाठी प्रामाणिकपणे काम करून विश्वास संपादन केला पाहिजे.

**व्यापार वृध्दीसाठी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक आहे-**

१) अद्ययावत धान्य बाजाराची उभारणी होणे आवश्यक आहे.

२) गूळ, कांदा बटाटा व आंबा या शेतमालास शासनाने निर्यात क्षेत्र म्हणून घोषित केले पाहिजे व आवश्यक त्या सोयीसुविधा दिल्या पाहिजेत.

३) व्यापार संबंधातील शासनाच्या काही जाचक अटी रद्द झाल्या पाहिजेत. उदा. शासनाने गूळाचा रंग विचारात न घेता अखाद्य गूळाचा मळीच्या व्याख्येत समावेश करणेचा कायदा केला होता.

बाजारपेठेच्या विकासात शेतकरी, व्यापारी आणि बाजार समिती यांचेबरोबरच कामगारवर्गाचे श्रम व कौशल्य यांचा सहभाग आहे. येथील कामगार स्वाभिमानी व कर्तृत्ववान आहेत. त्यांचे मागे शाहूरायांच्या कार्याची प्रेरक शक्ती आहे. बाजार समितीने कामगारांच्या हितसंवर्धनासाठी आजपर्यंत विशाल दृष्टिकोन बाळगला आहे. बाजार समितीमध्ये मजूर विश्रांती गृह असून या बाजारपेठेस ''मापाडी, हमाल, इतर असंघटीत कामगार (रोजगार आणि कल्याण) कायदा, १९६९'' हा कायदा सन १९८५ पासून लागू केला आहे. तोलाई आणि हमालीच्या रकमेच्या २८% इतकी लेव्ही माथाडी ब्रोर्डाकडे संबंधीत अडते व व्यापारी जमा करतात. या रकमेमधून माथाडी कामगारांना पेंन्शन, प्रॉव्हिडंड फंड, बोनस, आपतकालीन तात्काळ मदत इ. कल्याणकारी योजना राबविल्या जातात. बाजारसमितीने हमाली, तोलाईचे दर निश्चित केलेले असून इतर बाजारपेठेंच्या तुलनेत ते चांगले आहेत. त्याचबरोबर कामगारांनी एखाद्या शेतीमाल विक्रीचा हंगाम चालू असताना संघटित होऊन अचानकपणे संप केल्यास बाजारपेठेचे नुकसान होते. त्यामुळे त्यांनी आपल्या मागण्यांची पूर्तता योग्य मार्गानेच करून घेतली पाहिजे.

**बाजारसमितीने, व्यापाऱ्यांनी व शासनाने कामगार हितासाठी नेहमीच योग्य धोरणे व चांगले उपक्रम राबविणे आवश्यक आहे. यासाठी पुढील गोष्टींची पूर्तता केली पाहिजे-**

१) बाजार समितीने कामाची उपलब्धता पाहून हमाल व तोलाईदार यांची योग्य नेमणूक केली पाहिजे.

२) बाजार समिती शेतकरी व व्यापारी यांनी सामंजस्याने बदलत्या परिस्थितीनुसार व महागाईनुसार कामाच्या मोबदल्यात योग्य ती वाढ केली पाहिजे.

प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणामध्ये कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीमधील राजकारण व राजकीय नेतृत्व याचा मागोवा घेणेत आलेला आहे. बाजारसमितीमधील निवडणुका आणि त्या अनुषंगाने होणारे राजकारण व समितीच्या विकासातील राजकीय नेतृत्वाचे योगदान याचा अभ्यास केला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था आणि राजकारण यांचे जवळचे संबंध आहेत. महाराष्ट्रात कोल्हापूर जिल्हा राजकीयदृष्ट्या जागृत आहे. जिल्हा परिषद, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हा दूध संघ, याप्रमाणेच सत्ता संपादनाच्या दृष्टीने कोल्हापूर बाजार समितीस राजकीयदृष्ट्या जिल्हापातळीवरील सत्तास्थान म्हणून महत्व आहे. आजपर्यंत जिल्ह्यातील सर्वच राजकीय नेतेमंडळींचा निवडणूका व पदाधिकारी निवड या अनुषंगाने बाजार समितीच्या राजकारणाशी संबंध आला आहे. जिल्ह्यातील खासदार, आमदार, व इतर नेतेमंडळींना आपल्या कार्यकर्त्यांची राजकीय सोय व नेतृत्व विकासाची संधी म्हणून बाजारसमितीचा उपयोग झाला आहे. जिल्ह्याचे नेते म्हणून आपला राजकीय प्रभाव निर्माण करण्यासाठी व ते कायम राखण्यासाठी बाजार समितीच्या सत्तेचा कांही नेतेमंडळींनी जाणीवपूर्वक राजकीय उपयोग केला आहे. बाजारसमितीचे आजपर्यंतचे राजकारण काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत गटांमध्ये झालेले आढळते. कांही राजकीय कार्यकर्त्यांची कारकीर्द बाजारसमितीच्या राजकारणातून आकाराला आली. येथील राजकीय कारकीर्दीचा उपयोग अनेकांना जिल्ह्यातील इतर महत्वाच्या संस्थांमध्ये झालेला आहे. बाजार समितीच्या एकमुखी नेतृत्वाचा काही नेत्यांना राज्याच्या व जिल्ह्याच्या राजकारणात प्रभावी उपयोग झालेला आहे.

बाजारसमितीच्या निवडणूकातील आतापर्यंतचे राजकारण पाहता सुरवातीच्या काळात व्यक्तिगत कार्यावर राजकारण अवलंबून होते. सामाजीक व सहकारातील कार्याच्या आधाराने निवडणूक लढविली जात होती. १९६३ चा कायदा अंमलात आल्यानंतर आघाडीच्या राजकारणास सुरवात झाली. त्यावेळेपासून आजपर्यंतच्या सर्व निवडणूका काँग्रेस अंतर्गत नेतेमंडळींच्या गटांमध्ये

लढविल्या गेल्या आहेत. बाजार समितीमध्ये एकमेकांच्या विरोधी आघाडीतून निवडून आलेले प्रतिनिधी जिल्ह्यातील बदलत्या राजकारणानूसार अपल्या स्थानिक नेत्यांच्या सागंण्यावरून बाजारसमितीच्या राजकारणात सोयीनुरुप आघाडी करतात. बाजारसमितीचे पदाधिकारी पद आपल्या जवळच्या कार्यकर्त्यास मिळण्यासाठी, जिल्ह्यातील प्रमुख नेतेमंडळीमध्ये रस्सीखेच होताना दिसते.

निवडणूकीतील राजकीय सत्तास्पर्धा वगळता बाजारसमितीच्या विकासासाठी जिल्ह्यातील नेतेमंडळी व बाजार समितीचे प्रतिनिधी चांगल्या कार्यासाठी नेहमीच एकत्र येताना दिसतात. बाजारपेठेच्या विकासासाठी संचालक मंडळ जिल्ह्यातील खासदार, आमदार, व स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य घेते. आजपर्यंतच्या सभापती, उपसभापती व संचालक मंडळाने बाजारसमितीच्या विकासासाठी प्रामाणिकपणे आपले राजकीय योगदान दिले आहे. बाजारसमितीच्या अडचणीच्या काळात सर्वसंबंधीत घटकांना विचारात घेऊन नेतेमंडळी समस्यांचे निवारण करतात. समितीतील राजकीय कारकीर्दीचा जिल्ह्यातील इतर संस्थांमध्ये काम करण्यासाठी काही कार्यकर्त्यांना उपयोग झाला आहे. विशेषत: जिह्यातील ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनां आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविण्याची संधी बाजारसमितीमध्ये मिळाली आहे.

कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीमध्ये आजपर्यंतच्या राजकीय नेतृत्वाने राजर्षि शाहू महाराजांच्या विचारांचा, आदर्शांचा व बाजारपेठेच्या निर्मितीतील योगदानाचा नेहमीच आदर व सन्मान राखला आहे.

**बाजार समितीच्या विकासात राजकीय योगदानाचे महत्व असले तरी पक्षीय आणि गटबाजीचे राजकारण व निवडणुकीतील इर्षा आणि सत्तास्पर्धा यामुळे बाजारसमितीच्या विकासावर काही प्रमाणात अनिष्ट परिणाम जाणवतो-**

१) बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणूकांमध्ये आघाडीच्या राजकारणामुळे निवडून आलेल्या प्रतिनिधीमध्ये प्रत्यक्ष कामकाज करत असताना गटतट आढळतात.

२) समितीतील सत्तास्पर्धेमुळे विरोधातील लोकप्रतिनिधी बाजारपेठेच्या विकासाच्या प्रश्नांकडे जाणिवपूर्वक लक्ष देत नाहीत.

३) बाजार समितीच्या सत्तेचा इतर निवडणूकांमध्ये सत्तसंपादनासाठी राजकीय उपयोग केला जातो.

४) बाजार समितीतील सत्तेच्या राजकारणामुळे समितीच्या विकासकार्यात मर्यादा पडतात.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या राजकीय परिस्थितीचे अवलोकन करता बाजार समितीत गटबाजीचे राजकारण असतानाही समितीचे स्थान महाराष्ट्रात उज्वल दर्जाचे आहे. समितीचे प्रशासन कार्यक्षम आणि अव्वल दर्जाचे आहे. समितीच्या आर्थिक स्थितीत नेहमीच प्रगती झाली आहे. याचाच अर्थ बाजारसमितीच्या कार्यक्षमतेवर राजकारणाचा फारसा वाईट परिणाम झालेला नाही. उलटपक्षी कार्यक्षेत्रातील सहकारी विकास सेवा संस्था व ग्रामपंचायत सदस्यांच्या मतदानाच्या अधिकारामूळे योग्य शेतकरी प्रतिनिधींची निवड केली जाते. त्यामुळे येथे राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण झाले आहे. शेतकऱ्यांशी संबंधीत ग्रामीण नेतृत्वाला योग्य संधी मिळाली आहे. आजपर्यंतच्या राजकारणात समाजातील विशिष्ट घटकांना येथे राजकीय सत्ता मिळाली आहे. तरीही समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना प्रतिनिधीत्वाची योग्य संधी मिळालेली नाही. त्याचबरोबर महिला शेतकऱ्यांना प्रतिनिधीत्वाची संधी दिली पाहिजे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची आजपर्यंतची वाटचाल पाहता बाजार समितीने कृषि, औद्योगिक विकासात महत्वाचे काम केले आहे. राजर्षि शाहू महराजांच्या आदर्श विचाराने वाटचाल करताना जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनमानात सुधारणा करण्याचे मोलाचे काम केले आहे. मार्केटच्या कायद्यानुसार शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी प्रामाणिक कार्य केले असून प्रशासकीय कामकाज गतीमान आहे. निवडणूकीतील राजकारणाबरोबरच येथील नेतृत्वाने बाजारपेठेच्या विकासात योगदान दिले आहे. बाजारसमिती, शेतकरी, व्यापारी व कामगार आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने या बाजारपेठेची उलाढाल दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीने आपले स्थान उज्वल राखले आहे. बाजार समितीचे कार्य इतर बाजार समित्यांना मार्गदर्शक असून लहान बाजार समितींच्यादृष्टीने आदर्श व अनुकरणीय आहे.